पोलीस उप अधिक्षक अँन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती

सत्यमेव जयते

दिनांक : ०८.०९.२०२०

—: प्रेस नोट :—

| | |
|---|---|
| ए. सी. बी. | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सुशिल सुरेशराव गुल्हाणे, वय ४१ वर्ष, पद — ना.पो.कॉ. ब.नं. १४४५, पो.स्टे.धारणी, अमरावती ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/— रुपये तडजोडीअंती ३,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/— रुपये. |
| घटनास्थळ | श्री.संजय गोपणे यांचे प्रेसचे दुकानामध्ये, जयस्तंभ चौक, धारणी ता. धारणी, जि.अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | ०८/०९/२०२० चे १२.४६ ते १३:०० वा. दरम्यान |

थोडक्यात माहिती :— यातील तकारदार महीला असुन तिचे जवाई व त्यांचे मोठे भाउ यांचे विरूध्द दिनांक २०/०८/२०२० पो.स्टे.धारणी अमरावती ग्रामीण येथे दाखल N.C चा रिपोर्ट न वाढविणे करीता व सहकार्य करण्याकरीता पोलीस स्टेशन धारणी येथील बिट मधील लोकसेवक श्री.गुल्हाणे हे ४,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तकार प्राप्त झाली. सदर तकारीचे अनुषंगाने आज दिनांक ०८/०९/२०२० रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील नमुद आलोसे यांनी रिपोर्ट न वाढविणेकरीता व सहकार्य करण्याकरीता तडजोडीअंती ३,०००/— रू. लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष आलोसे श्री.सुशिल गुल्हाने यांनी सदर लाच रक्कम ३,०००/— रुपये श्री.संजय गोपणे यांचे प्रेसचे दुकानामध्ये, जयस्तंभ चौक, धारणी येथे स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले व गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, व पोलीस उप अधीक्षक, श्री. गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राहुल तसरे, स्टाफ ना.पो.कॉ.विनोद कुंजाम, युवराज राठोड पो.कॉ. सुनिल जायभाये व सहा.पो.उप.नि.श्री.सतिष किटुकले यांनी पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— अँन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी कमांक — ०७२१—२५५२३५५, २५५३०५५.

(राहुल तसरे)
पोलीस निरिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.
मो.क.८८०५१६३१००

Scanned with CamScanner